# जिल्हा निवड समिती नाशिक
# जिल्हा परिषद नाशिक पदभरती २०११
# मुलाखतींचा दिनांक व वेळ याबाबत वेळापत्रक

दिनांक ९ ऑक्टोबंर २०११,दिनांक १६ ऑक्टोंबर २०११ व दिनांक २३ ऑक्टोंबर २०११ रोजी झालेल्या लेखी परिक्षांच्या अनुषंगाने मुलाखत पात्र उमेदवारांच्या याद्या http://www.zpnashikgov.in तसेच www.BrainAge.in या संकेत स्थळावर तसेच जिल्हा परिषद नाशिक या ठिकाणी प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. सदर मुलाखत पात्र उमेदवारांच्या यादीत ज्यांची नावे आहेत त्यांच्या करीता मुलाखतींचे आयोजन खालीलप्रमाणे नमुद दिनांकास सकाळी ११.०० वाजेपासुन जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे.

| अ.क्र. | मुलाखत पदाचे नाव | मुलाखत दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | दिनांक ५ नोव्हेंबर २०११ | सकाळी ११.०० वाजता |
| २. | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | दिनांक ५ नोव्हेंबर २०११ | सकाळी ११.४५ वाजता |
| ३. | विस्तार अधिकारी (कृषी) | दिनांक ५ नोव्हेंबर २०११ | दुपारी १२.३० वाजता |
| ४. | पर्यवेक्षिका (ए.बा.वि.से.यो) | दिनांक ५ नोव्हेंबर २०११ | दुपारी १.१५ वाजता |
| ५. | औषधनिर्माण अधिकारी | दिनांक ५ नोव्हेंबर २०११ | दुपारी ३.०० वाजता |
| ६. | आरोग्य सेवक (महिला) | दिनांक ५ नोव्हेंबर २०११ | दुपारी ४.०० वाजता |
| ७. | आरोग्य सेवक (पुरुष) | दिनांक ८ नोव्हेंबर २०११ | सकाळी ११.०० वाजेपासुन |
| ८. | कंत्राटी ग्रामसेवक | दिनांक ११ नोव्हेंबर २०११ (फक्त खुल्या प्रवर्गात निवड झालेले आसन क्रं.१०७०००११ ते १०७०१५५१) | सकाळी ११.०० वाजेपासुन |
| | कंत्राटी ग्रामसेवक | दिनांक १२ नोव्हेंबर २०११ (फक्त खुल्या प्रवर्गात निवड झालेले आसन क्रं.१०७०१५६२ ते १०७०३९४२) | सकाळी ११.०० वाजेपासुन |
| | कंत्राटी ग्रामसेवक | दिनांक १३ नोव्हेंबर २०११ (अपंग,अनु.जाती,अनु,जमाती, विजा-अ,भज-ब,क,ड,विमाप्र, इमाव या प्रवर्गात निवड झालेले) | सकाळी ११.०० वाजेपासुन |

तरी मुलाखतपात्र उमेदवारांच्या यादीत नाव असलेल्या उमेदवारांनी सदर मुलाखतीस मुळ गुणपत्रक आणि प्रमाणपत्रांसह पडताळणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात मुलाखतीच्या दिनांकास मुलाखतीच्या वेळेपुर्वी २ तास अगोदर उपस्थित रहावयाचे आहे.

मुलाखतीस येताना खालील प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणावयाच्या आहेत.

१) उमेदवाराचे शैक्षणिक अर्हता, अनुभव या बाबतची प्रमाणपत्रे.

२) आरक्षीत पदासाठी अर्ज केला असल्यास किंवा मागासवर्गीय म्हणुन सवलत घेतली असल्यास उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र तसेच वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व. या प्रवर्गाबाबत तसेच खुल्या प्रवर्गातुन महिला आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या महिलांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबत प्रमाणपत्र.

४) उमेदवाराकडे संगणक अर्हता असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र.

५) उमेदवार अपंग, माजी सैनिक, भुकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त, पदवीधर, पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी,हंगामी क्षेत्र कर्मचारी(फवारणी), अंगणवाडी सेविका असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

६) उमेदवारांनी क्रिडा, कला, सांस्कृतीक, वक्तृत्व या क्षेत्रात तालुका स्तर / आंतरशालेय, जिल्हास्तर/ आंतरमहाविद्यालय, राज्यस्तर, राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीयस्तर स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळविली असल्यास त्याबाबतची प्रमाणपत्रे.

उमेदवारांनी वरील प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणावयाच्या आहेतच शिवाय या प्रमाणपत्रांच्या सत्य प्रतींचा एक संचदेखील सोबत आणावयाचा आहे. मुळ प्रमाणपत्रावरुन उमेदवाराने अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे तसेच सत्यप्रती तपासल्यानंतर मुळ प्रमाणपत्रे लागलीच परत करण्यात येतील.

सदर मुलाखतीबाबत कोणलाही व्यक्तिश: पत्र देवुन कळविले जाणार नाही. उमेदवारांना अधिक माहिती हवी असल्यास जिल्हा परिषद नाशिकच्या सामान्य प्रशासन विभागातील कक्ष अधिकारी यांचेशी ०२५३-२५९१०१० या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

सही XXX

**मा.जिल्हाधिकारी,नाशिक यांचे मान्यतेने.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक तथा**
**सदस्य जिल्हा निवड समिती, नाशिक**